
आज़ादी का अमृत महोत्सव

# भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव : संधी आणि आव्हाने



मुख्यसंपादक
प्राचार्य.डॉ.सदाशिव सरकटे

# भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव : संधी आणि आव्हाने

मुख्य संपादक

प्राचार्य डॉ. सदाशिव हरिभाऊ सरकटे

जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

कला व विज्ञान महाविद्यालय शिवाजीनगर, गढी ता. गेवराई, जि. बीड.

SIDDHI PUBLISHING HOUSE

NANDED – 431605.

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | संशोधन पेपरचे नांव | लेखक | पान क्र. |
|---|---|---|---|
| ०१ | 'स्वातन्त्रप्रतिज्ञा' | डॉ. मीनल श्रीगिरीवार | १३ |
| ०२ | १९९० नंतरची मराठी कविता | प्रा. डॉ. रामहरी मायकर | २० |
| ०३ | आंबेडकरी चळवळीतील प्रबोधन गीते | प्रा. संतोष मारुती शिंदे | २८ |
| ०४ | अंधश्रद्धा निर्मुलनामध्ये संत साहित्याचे योगदान | प्रो. डॉ. सोपान माणिकराव सुरवसे श्री.गोविंद दासा गरड | ३४ |
| ०५ | जगतिकीकरण आणि मराठी भाषा | प्रा. राहुल भागवत गायकवाड | ४३ |
| ०६ | स्वातंत्र्यलढ्यात मराठी भाषा आणि साहित्याचे योगदान | प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे | ४९ |
| ०७ | स्वातंत्र्योत्तर काळातील विमुक्तांच्या साहित्य प्रवाहातील स्वातंत्र्य, प्रेरणा व प्रवृत्ती | डॉ. एम. के. शिंदे | ५६ |
| ०८ | "स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील एक दुर्लक्षित विद्वान - गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकर" | श्रीमती. वर्षा मुरलीधर पोतदार | ६२ |
| ०९ | दलित, ग्रामीण, स्त्रीवादी आणि आदिवासी साहित्यातून आलेले स्वातंत्र्य चित्रण | प्रा. डॉ. सदाशिव हरिभाऊ सरकटे फरांडे सारिका संदिपान | ७५ |

# स्वातंत्र्यलढ्यात मराठी भाषा आणि साहित्याचे योगदान

**प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे**
संशोधन मार्गदर्शक व मराठी विभागप्रमुख
**प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे**
मराठी विभाग. कला व विज्ञान महाविद्यालय शिवाजीनगर गढी. ता. गेवराई जि. बीड

'भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव' आपण मोठ्या उत्साहात साजरा करत आहोत. स्वातंत्र्यलढा आणि स्वातंत्र्य यातून आपल्याला काय मिळाले, या पंचाहत्तर वर्षातील ही वाटचाल पाहता, आम्ही काय नेमकेपणाने काय साधले आहे. याची अमृत महोत्सवाच्या निमित्ताने चर्चा घडू लागली, मंथन होऊ लागले, महात्मा गांधींनी 'भारत छोडो' चा जो नारा दिला, त्या दांडीयात्रा दिनानिमित्ताने 'भारतीय स्वातंत्र्याच्या महोत्सवाची' सुरुवात झाली. महात्मा गांधी यांनी या स्वातंत्र्य लढ्याची मुहूर्तमेढ रोवली आणि पाहता-पाहता संबंध भारत या स्वातंत्र्य लढ्यात सामील झाला. ज्याने त्याने आपल्या परीने या लढ्याला व्यापक करण्याचा प्रयत्न केला. भारताची सांस्कृतिकता, स्वातंत्र्यलढा आणि त्यातील अनेकांचे अनेक प्रकारचे योगदान, ऊर्जादायी, प्रेरणादायी घटना प्रसंग, स्वातंत्र्यलढ्यातील अनेक वीरांचे बलिदान, स्वातंत्र्य मिळविण्याची ध्येयासक्ती या साऱ्यांचे आपल्याला नीटपणे आकलन व्हावे आणि येणाऱ्या पुढच्या पंचवीस वर्षातील आपली वाटचाल सशक्त आणि स्वावलंबी व्हावी म्हणून हा अमृत महोत्सव अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. तो अधिक

सुजाणपणे आपण समजुन घेतला पाहीजे. म्हणूनच या काळी घडलेल्या सर्व घटना प्रसंग, व्यक्ती यांचे स्मरण करून आपल्या वर्तन व्यवहारात बदल घडावा आणि भविष्यकाळाची वाटचाल उज्वल व्हावी म्हणून हा अमृत महोत्सव महत्त्वाचा ठरतो.

महाराष्ट्र हा संपन्न भूप्रदेश आहे. समृद्ध साहित्य परंपरा, सुधारणावादी दृष्टिकोन, शैक्षणिक यांच्या बाबतीत जगा महाराष्ट्र पुढारलेला म्हणून ओळखला जातो, तसाच तो राष्ट्रव्यापी स्वातंत्र्य चळवळीसाठी देखील प्रसिद्ध आहे. राजकीय, सांस्कृतिक आणि सामाजिक संघर्षात महाराष्ट्र आणि मराठी माणूस नेहमीच आघाडीवर आहेत. संघर्षाची कारणे, निमित्त अथवा ठिकाण बदलते असेल, पण मराठी साहित्यिक अशाच संघर्ष बिंदूला व्यापक करून भूमिकेच्या पातळीवर ठामपणा आणण्यासाठी प्रयत्नरत असल्याचे दिसेल. मानवतेचा जीवनवादाच्या अनुषंगाने विचार करून जगाला आपलसं म्हणणारी जी संस्कारी वृत्ती मराठी साहित्याच्या मुळाशी आहे, तीच वृत्ती स्वातंत्र्यसंग्रामात देखील शब्दांना कृतीची जोड देण्यात पुढे राहिली आहे. चळवळींना पाठबळ देऊन इथल्या साहित्यिकांनी नेहमीच सर्वसामान्यांना आपलेसे करण्याचे काम केले आहे. कविता, कथा, कादंबरी, निबंध, शाहिरी, पत्रकारिता, इत्यादींच्या माध्यमातून स्वातंत्र्य चळवळीला प्रवर्धित करण्याचे काम मराठी साहित्यिकांनी केल्याचे आपणास दिसेल.

एकोणिसाव्या शतकातील हा काळ सामाजिक सांस्कृतिक दृष्टीने जागृतीचा कालखंड होता. यात भारतातल्या अनेक भाषांनी राष्ट्रीय वृत्तीला चेतना देणारी साहित्य निर्मिती केली, ऊर्जा देणाऱ्या साहित्य प्रकारांची रचना केली आहे. भारतालाच नाही तर आशिया

आणि आफ्रिकेतील स्वातंत्र्य लढ्याला देखील प्रोत्साहित करण्याचे काम या साहित्यकृतीने केलेले आहे. महात्मा गांधीजींचा प्रभाव भारतातल्या अनेक भाषांवर पडला तसाच तो मराठी भाषेवर देखील पडला असल्याचे स्पष्टपणे जाणवते. याची प्रचिती मराठी कवितेतून सातत्याने येत राहते.

**"बलसागर भारत होवो,**
**विश्वात शोभुनी राहो.**
**कंकण करि बांधियले,**
**जनसेवे जीवन दिधले.**
**राष्ट्रार्थ प्राण हे उरले,**
**मी सिद्ध मरायाला हो."**

साने गुरुजींची ही कविता, भारतीय वृत्ती आणि मूल्य यांना प्रस्थापित करण्याचा नेटाने अट्टाहास धरणारी आहे. स्वातंत्र्यलढ्याच्या निमित्ताने अनेक वेळा तुरुंगवासाची वेळ त्यांच्यावर आली आणि यातूनच राष्ट्रभक्ती, मातृभक्ती, राष्ट्रनिष्ठा व मूल्यात्मक श्रद्धा त्यांच्या लेखनात प्रखरपणे जाणवत राहते. 'खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे' अशी अभिव्यक्ती करून साने गुरूजींची विचारनिष्ठा व्यापक होत जाते.

'पूर्व दिव्य ज्यांचे त्यांना रम्य भावी काल' असे म्हणणारे कवी विनायक आपल्या कवितेतून प्रखर राष्ट्रीय वृत्ती व ज स्वीकार आणि स्वतंत्र प्रेम यांचा उत्कट आविष्कार आपल्या कवितेतून करतात.

**"देशभक्ता प्रसाद बंदिशाला**
**शृंखलांच्या गुंफिल्या पुष्पमाळा**
**चिंता सिंहासन शूल राजदंड**

मृत्यू दैवत दे अमरता उदंड..."

हीच स्वाभिमान, अभिमानाची परंपरा या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने पुढच्या पिढी कडे देत असताना मराठी साहित्यिकांचा हा साहित्य संस्कार देशाबद्दल आत्मीयता प्रदान करण्यासाठी निरंतर प्रेरणा देणारा ठरतो. आपण राष्ट्रीय ऐक्याचा, मानवतेचा, संवेदनशीलतेचा अमृत अनुभव यानिमित्ताने घेतो आहोत.

अनन्यसाधारण देशभक्ती आणि तेजस्विता यांच्या संगमामुळे सावरकरांनी ही अशाच दुर्दम्य इच्छा, आशावाद, आकांक्षा प्रकट करणाऱ्या कवितांमधून देशाविषयी जाज्वल्य अभिमान प्रगट केला. क्रांतिकारी देशभक्त म्हणून

**'ने मजसी ने परत मातृभूमीला**
**सागरा प्राण तळमळला'**

इतक्या अनावर मनाच्या ओढीच्या काव्यपंक्तीतून त्यांनी प्रखर राष्ट्रवाद चित्रीत केला आहे. कुसुमाग्रजांच्या कवितेतील क्रांतीगीत ही मराठी काव्य विश्वाला लाभलेली मोठी देणगी आहे.

**"जय जय कार क्रांतीचा गर्जा जय जय कार**
**अन वज्राचे छातीवरती घ्या झेलून वार"**

जीवनाच्या समग्रतेचे भान त्यांनी प्रकट करतानाच मराठी मनाला राष्ट्रीय पातळीवर देखील आणखी ठसठशीत करण्याचे काम केले आहे. सामाजिक, सांस्कृतिक जाणिवांसोबतच त्यांच्या साहित्यातून राजकीय जाणिवा देखील व्यक्त होत जातात.

संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत नामदेव, संत तुकाराम, रामदास, महात्मा फुले यांच्या विचाराने आणि कार्याने प्रभावित होऊन मराठी साहित्याची घडण झालेली आहे. स्वातंत्र्यलढ्याच्या कालावधीत

भारताच्या इतिहासाची, मराठीच्या वीर परंपरेची चेतना व प्रेरणेचा नवे शब्द फुलले ते मराठी भाषेच्या साहित्यिकांच्या लेखणीतूनच. आणि या माध्यमातूनच त्यांनी साहित्यिक निष्ठा दाखवून देऊन भारतीय स्वातंत्र्य संग्रामाला हातभार लावण्याचे काम केले आहे.

साने गुरुजींची क्रांती, नवा प्रयोग सावरकरांची माझी जन्मठेप, श्रीधर व्यंकटेश केतकर यांची निशस्त्राचे राजकारण, विनायक भोळे यांची फाटकी वाकळ, तर वरेरकरांची मी रामजोशी या कादंबऱ्यांतून राष्ट्रवाद आणि जाज्वल्यता प्रत्ययास येते. स्वातंत्र्यासाठी प्राणपणाने लढणाऱ्यांचा जीवनपट व भूमिका त्यांनी विशद केली आहे. महात्मा फुले यांच्या शेतकऱ्यांचा आसुड, गुलामगिरी यांनी तर इंग्रजी सत्तेच्या धोरणाचे लचके तोडले आणि सर्वसामान्य माणसाला आपल्या हक्काचे दर्शन घडवले. व्यंकटेश माडगूळकरांची कोवळे दिवस, स्वातंत्र्य चळवळ आणि वावटळ, सत्तावन्न ते सत्तेचाळीस ही वि. स. वाळींबे यांची कादंबरी, या आजही आपल्या मनावर खोल परिणाम करून जातात. कारण या सर्व कादंबऱ्यांचे चित्रण हे या कादंबरीकाराने राष्ट्र प्रेमाणे, निश्चित ध्येयाने व निष्ठेने केलेले आहे. स्वातंत्र्य आणि स्वातंत्र्य लढ्याची ही एक एक स्वतंत्र अशी संस्मरणीय गाथाच आहेत. गो. नी. दांडेकर, वि. स. खांडेकर, ना. सी. फडके, ना. वी. बापट, द. ना. शिखरे अशा अनेक कादंबरीकारांनी स्वातंत्र्यलढ्याच्या घटना प्रसंगाच्या कथानकाला मध्यवर्ती स्थान दिले आहे. ह. ना. आपटे यांच्या उपाकाल, वज्राघात, सूर्यग्रहण याही कादंबऱ्या इतिहास आणि सामाजिक दृष्टिकोनातून स्वातंत्र्यलढ्याला प्रेरित करण्याचे कार्य करतात. त्यांनी इतिहासाला शब्दबद्ध करत वर्तमानाला दिशा देण्याचे काम केलेआहे. भविष्याची जाणीव करून देण्याचा प्रयत्न केला आहे.

वृत्तपत्रीय क्षेत्रातूनही स्वातंत्र्याचा लढा मुखर करण्यात मराठी भाषा व प्रदेश मागे राहिलेला नाही. केसरी, मराठा ज्या माध्यमातून गोपाळ गणेश आगरकर चिपळूणकर विष्णुशास्त्री चिपळूणकर, लोकहीतवादी, ना. वा. टिळक, करंदीकर इत्यादींनी राष्ट्रीय जाणिवेची समाजजीवनात पेरणी करण्याचे काम केले. आणि तितक्याच प्रभावीपणे त्याचा प्रचार, प्रसार देखील केला. याच माध्यमातून लोकमान्य टिळकांनी ही क्रांतीतत्त्वाला आणखी धारदार करण्याचे काम केले. गीतारहस्य हा त्यांचा एक ग्रंथ, ज्यातून अध्यात्मिकतेला राष्ट्रीयत्वाची, स्वदेशीची जोड देऊन त्यातून नवा अर्थ प्रतीत करणारा असा हा ग्रंथ ठरला.

**'चैतन्याची थाप डफावर**
**लागे शाहिरी कर जाया**
**दरीदरीतून ऊठे मावळा**
**अकोला आस्था पाया**
**तोरण्यावर लावूनी तोरण**
**मराठीचा बांधुनी पाया**
**धन्य तो धन्य शिवाजी राया ।'**

भारतीय स्वातंत्र्यलढ्यात महाराष्ट्राचे जे योगदान आहे, त्यात सर्वात जास्त प्रेरणा शाहिरांची होती. हाच स्वातंत्र्यलढ्याचा विचार महाराष्ट्राच्या प्रत्येक गावागावातून, वाड्या-वस्तीवरून समाजाच्या तळागाळापर्यंत डफावर थाप मारून पोहोचण्याचे फार मोठे कार्य हे शाहिरांनी केलेले आहे. स्वातंत्र्य लढ्यात उडी घेण्याची प्रेरणा अनेकांना या शाहिरांच्यामुळे मिळालेली आहे. राष्ट्रप्रेमाने ओथंबलेल्या आणि स्फुर्तीदायी अशा अनेक पोवाड्यांची शाहिरांनी जाणीवपूर्वक रचना केलेली आहे. यात वसंत बाबत, खाडिलकर, अण्णाभाऊ साठे, गोपीनाथ कुलकर्णी, जयराम जामखेडकर, सिद्राम चाटे, शरद जोशी,

कृष्णराव साबळे अशा कितीतरी शाहिरांचा उल्लेख केला जाऊ शकतो. आपल्या प्राणांची बाजी लावून जनजागृतीचे जे ऐतिहासिक योगदान शाहिरांनी स्वातंत्र्यलढ्याला दिले आहे, त्याला स्वातंत्र्याच्या इतिहासात तरी तोड नाही.

**संदर्भग्रंथ -**


१) स्वातंत्र्योत्तर मराठी कविता, संपादक, वसंत पाटणकर

२) आधुनिक मराठी काव्यसंपदा, संपादक, मधु मंगेश कर्णिक

३) आधुनिक मराठी कविता- एक विश्लेषण, प्रकाश देशपांडे केजकर

४) स्वातंत्र्य चळवळ आणि मराठी कादंबरी, डॉ. भरत जाधव

५) स्वातंत्र्यलढ्याच्या काळातील राष्ट्रीय गीते व पोवाडे, संपादक, शाहिर विजय जगताप


***